सं. फौजदारी खटला क्र. <u>१०८४/२०२३</u>
कुलदिप विरूद्ध नंदकिशोर
**निशाणी १७ खाली**

<u>**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ कुलदिप संतोषराव मंगळे याची उर्वरित सरतपासणी शपथेवर सुरू — फिर्यादी तर्फे ॲड श्री. जी. आर. पानझडे यांचे मार्फत.**</u>

मी आरोपीला ओळखतो. मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी १७ वरील मजकुर वाचला आहे. आरोपीने मला दिलेला वादातील मुळ धनादेश मी अभिलेखावर दाखल केला आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर आरोपीने लिहिलेला आहे. सदर मुळ धनादेशाला **निशाणी २२** देण्यात येते. सदर धनादेश मी वटवण्याकामी बॅकेत टाकला असता तो अनादरित झाला. त्याबाबत बॅकेने मला मेमोद्वारे कळवले होते. सदर मुळ मेमो मी अभिलेखावर दाखल केला आहे. त्यास **निशाणी २३** देण्यात येते. मी आरोपीला पाठवलेल्या दि. २०/०७/२०२३ रोजीच्या नोटीसीची स्थळप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. सदर नोटीसीच्या स्थळप्रतीस **निशाणी २४** देण्यात येते. आरोपीला निशाणी २४ वरील नोटीस पाठवल्याबाबत मुळ पावती मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येते. निशाणी २४ वरील मुळ नोटीस आरोपीला प्राप्त झाल्याबाबत पोस्टाची मुळ पोहच पावती अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येते. **सरतपास पुर्ण**.

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲड. एम. पी. देव यांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपावेतो तहकुब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**
(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. १८.०७.२०२५
अकोट

**RCC No. 1084/2023**
**Evidence/Exh. 17**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file Evidence are same word to word as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Tq. Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 18/07/2025. |
| Evidence Signed by P.O on | : | 18/07/2025. |
| Evidence Uploaded on | : | 19/07/2025. |